# जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद.

जा.क्र. संगणक/ ३११९ /२०२५

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद

दिनांक : ०८/०४/२०२५

## जाहीर सूचना

### निरूपयोगी, कालबाहय संगणक व आय.टी. साहित्याचे विक्रीबाबत सूचना

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथील जुन्या, निरूपयोगी, आय.टी. साहित्याची (जेथे आहे तेथून आणि जशी आहे तशी याप्रमाणे) विक्री करावयाची आहे. त्याकरीता निविदा मागविण्यात येत आहेत.

सोबत साहित्याची यादी असून नमूद साहित्य या कार्यालयामध्ये दिनांक ०८/०४/२०२५ पासून ते दिनांक १६/०४/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत प्रत्यक्ष पाहता येईल.

तरी इच्छूक खरेदीदारांनी नमूद अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमूद कालावधी व वेळेमध्येच सीलबंद दरपत्रकाच्या निविदा या कार्यालयास सादर करावीत.

सोबत साहित्याची यादी.

(एस.सी.खटी)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश
उस्मानाबाद

**नियम व अटी :**

१. सादर केलेले दरपत्रक हे जोडलेल्या साहित्याच्या यादीतील सर्व साहित्यासाठी असावे.

२. मोहोरबंद निविदा हया दिनांक १६ एप्रील, २०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

३ . लिफाफयावर “आय.टी. साहित्याच्या विक्रीबाबत निविदा” असे नमूद करावे.

४. खालील नमूद अटी व शर्ती पूर्ण करणा–या आपल्या मोहरबंद निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद या पत्यावर सादर कराव्यात.

५. खरेदीदाराने दरपत्रकासोबत आधारकार्ड / पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

६. दरपत्रक मान्य/ अमान्य अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे सर्व अधिकार संगणक समिती, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे राहतील.

७. अधिकतम दर सादर करणा–या खरेदीदारास कळविण्यात आल्यानंतर संबंधितानी पुढील ०५ दिवसाचे आत (सुट्टीचे दिवस वगळून) दरपत्रकातील नमुद खरेदी रकमेचा भरणा दिलेल्या सुचनेप्रमाणे चलनाद्वारे नियोजित खात्यावर किंवा कार्यालयात जमा करून त्याची प्रत लेखी टिपणीसह या कार्यालयास सादर करावी. यानंतरच खरेदी केलेले साहित्य घेउन जाण्यास लेखी परवानगी देण्यात येईल.

८. खरेदीदारास साहित्य खरेदीची रक्कम भरणेबाबत अवगत केलेनंतर मुदतीत रक्कम न भरल्यास देण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील.

९. निरूपयोगी साहित्य ०७ दिवसाचे आत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. तद्नंतर प्रती दिन रू. १००/– (शंभर रूपये) दंड आकारण्यात येईल. १० दिवसांचे आत साहित्य ताब्यात न घेतल्यास मान्य दरपत्रक रद्द करण्यात येईल व जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.

१०. खरेदी केलेले साहित्य स्वत:च्या जबाबदारीवर घेवून जावे लागेल. त्याकरीता वाहतूक खर्च वा अन्य रक्कम / सोय कार्यालयाकडून उपलब्ध केली जाणार नाही तसेच साहित्य ज्या स्थितीत जेथे आहे तसेच ताब्यात देण्यात येईल.

## साहित्याची यादी

| अ.क्र. | वस्तू /साहित्याचे नाव | जड वस्तू संग्रह रजि. नं. पृष्ठ क्रमांक | जड वस्तू क्रमांक | नग संख्या | दर एकूण किंमत | खरेदीचा /पुरवठयचा दिनांक | वस्तूचे आयूष्यमान | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | व्ही.डी.ओ कॉन्फरन्स यूनिट व व्ही.सी. यूनीट टेबल (VC Unit Along with Table) | ८६ | व्ही.सी यूनीट जडवस्तू संग्रह नं. ३२/१ व्ही.सी. टेबल जडवस्तू संग्रह नं. ३२/२ | १ | रुपये ३,२२,४५९/– | दिनांक १४/०३/२००५ | २० वर्षे | |

**याची एक प्रत –**

1. सदरील निविदा सुचना ही https://osmanabad.dcourts.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे
2. जिल्हा न्यायालय / दिवाणी न्यायालय व.स्तर, / मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, उस्मानाबाद व सर्व तालुका न्यायालये यांचे नोटीस बोर्डवर डकविण्या करिता.